प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री पुरुषोत्तम पांडुरंग गायकवाड वय ५७ वर्षे शाखा अभियंता पंचायत समिती शेगांव रा सुटाळा खुर्द ता खामगांव जि. बुलडाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/— रुपये |
| घटनास्थळ | पंचायत समीती कार्यालय शेगांव येथील बाधकाम विभाग कार्यालय. |
| घटना तारीख | दि.२३.२.२०२१ |

थोडक्यात हकीकत :—

गुन्हयाची हकीकत अश्या प्रकारे आहे की तक्रारदार यांचे ग्रामपंचायतने सन २०१९—२० मध्ये सांगवा गट ग्रामपंचायत अंतर्गत एकफळ येथे अनुसुचित जाती नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे करीता हायमस्ट लाईट लावण्याचे काम करण्याचा आदेश सचिव ग्रामपंचायत सांगवा यांना दिनांक १९.०८.२०२० रोजी मा.अतिरिक्त मु.का.अ.जी.प.बुलडाणा यांचे आदेश क्रमांक १४२/२०१९ —२०२० दिनांक ०१.०२.२०२० नुसार पंचशिल नगर एकफळ येथे १,४७,०००/—रुपये मंजुर झाले होते.सदर काम करण्याकरीता ग्रामपंचायतीने गंगा एन्टरप्रायजेस कडोसी यांचे कडुन साहीत्य खरेदी करुन काम पुर्ण केले त्या कामासाठी साहीत्य खरेदी करुन बिल देण्याची हमी पदाधिकारी या हिशोबाने मी घेतली होती.काम पुर्ण करुन बिल काढणे करीता शाखा अभियंता श्री गायकवाड साहेब पंचायत समीती शेगाव यांना मी मागील हप्त्यामध्ये भेटलो असता. त्यांनी सांगितले की तुमचे ग्रामपंचायतचे बिल काढायचे असेल तर तुम्हाला बिलाचे अं. ५ टक्के प्रमाणे ७५००/—रुपये दयावे लागतील असे म्हणुन त्यांनी मला ७५००/—रुपये लाचेची मागणी केली.श्री गायकवाड साहेब शाखा अभियंता पंचायत समिती शेगांव हे ग्रामपंचायत ने केलेल्या कामाचे बिलांचे अं.५ टक्के ७,५००/— रुपये लाचेची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष ७,०००/—रुपये लाचेची रक्कम स्विकारुन लोकसेवक याने स्वत:चा अर्थिक फायदा करून घेवून लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतीबंधक कायदा १९८८ संशोधन २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही :— १. मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत अप्पर पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. आर.एन.मळघणे, पोलीस उपअधिक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा व सापळा पथकातील स्टाफ नापोका. विलास साखरे, नापोकॉ रविंद्र दळवी, पोकॉ विजय मेहेत्रे व चालक पोकॉ शेख अर्शीद यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अ‍ॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व ९६६५७०६६७७ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

( आर.एन.मळघणे )
पोलीस उपअधिक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner